। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४० वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

४२

साप्ताहिक

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD. No.
L2/RNP/PPR/04/2021-2023

FACEBOOK/
MANDESHVARTA

सांगोला * जुने वर्ष ४३ वे नवीन वर्ष २३ वे * रविवार दि.१२ एप्रिल २०२६ * पाने ४ * मूल्य १ रू * अंक १५ वा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष पुढाकारानेबालकांच्या मानसिक आरोग्य बळकटीसाठी महत्त्वपूर्ण सामंजस्य करार

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष पुढाकाराने राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याच्या दिशेने राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने बालकांच्या मानसिक आरोग्य बळकटीसाठी एकलव्य फाउंडेशन फॉर मेंटल हेल्थ, पुणे यांच्यासोबत महत्त्वपूर्ण सामंजस्य करार (एमओयू) केला आहे.या सामंजस्य कराराबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, बालकांचे



मानसिक आरोग्य हे राज्याच्या उज्ज्वल भविष्याचे पायाभूत तत्व आहे. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून आपण बालकांच्या भावनिक आणि मानसिक सक्षमीकरणासाठी एकत्रित प्रयत्न करण्यात येत आहेत.याचा फायदा भविष्यात होणार असून प्रत्येक बालक आत्मविश्वासाने आणि सकारात्मकतेने आयुष्याचा सामना करू शकेल.हा करार एकलव्य फाउंडेशन फॉर मेंटल हेल्थ, पुणे यांच्यासोबत करण्यात आला आहे.राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये केअरगिव्हर–लेड सेल्फ हेल्प ग्रुप्स च्या माध्यमातून मानसिक आरोग्य सेवा अधिक व्यापक करण्याचा उद्देश आहे. ऑफलाइन आणि डिजिटल माध्यमांचा वापर करून रुग्ण व त्यांच्या कुटुंबियांना आधार देणे, जनजागृती वाढवणे आणि मानसिक आजारांबाबतचा कलंक कमी करणे यासाठी हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. हा कार्यक्रम जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम (डीएमएचपी) सोबत समन्वय साधून राबवला जाणार आहे.सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पुढाकारातून करण्यात आलेला हा सामंजस्य करार पुढील तीन वर्षांसाठी कार्यान्वित असणार आहे. या करारामुळे राज्यातील आरोग्य व्यवस्थेत गुणवत्ता, उपलब्धता आणि सर्वसमावेशकता वाढवण्यास मोठी चालना मिळणार आहे.सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियान संचालक डॉ. कादंबरी बलकवडे, उपसचिव विलास बेंद्रे तसेच एकलव्य फाउंडेशन फॉर मेंटल हेल्थचे संस्थापक–संचालक, डॉ. प्रा. अनिल वर्तक, उपाध्यक्ष प्राची बर्वे, सचिव स्मिता गोडसे, खजिनदार मंजिरी चव्हाण, आजीवन सदस्य संध्या वर्तक यांच्या उपस्थितीत हा करार करण्यात आला.

## सांगोला:४ ग्रामपंचायतींसाठी ६ प्रभाग व ६ मतदान केंद्रे निश्चित

त्रसंगोला(प्रतिनिधी):-सांगोला तालुक्यातील काही ग्रामपंचायतींमध्ये सदस्य व थेट सरपंच यांचे निधन, राजीनामा किंवा अनर्हतेमुळे रिक्त झालेल्या जागांसाठी पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. यासंदर्भातील अधिसूचना दिनांक ३० मार्च २०२६ रोजी पंचायत समिती कार्यालय, तलाठी कार्यालय तसेच संबंधित ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे.

या पोटनिवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्याची मुदत ७ एप्रिल ते १३ एप्रिल २०२६ दरम्यान (११ व १२ एप्रिल सार्वजनिक सुट्टी वगळून) सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० या वेळेत तहसिल कार्यालय, सांगोला येथे निश्चित करण्यात आली आहे. नामनिर्देशनपत्रांची छाननी १५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता होणार असून उमेदवारी मागे घेण्याची अंतिम मुदत १७ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत आहे. निवडणूक लढविण्यात आल्यास मतदान २८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत पार पडणार आहे. या पोटनिवडणुकीत एकूण ४ ग्रामपंचायतींसाठी ६ प्रभाग व ६ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. अनकढाळ ग्रामपंचायतीमध्ये सरपंच पदाची थेट जनतेतून निवड होणार असून त्याचबरोबर ३ सदस्य पदांसाठी पोटनिवडणूक होणार आहे. तसेच खवासपूर, चिणके व चिकमहूद या ग्रामपंचायतींमध्ये प्रत्येकी १ सदस्य पदासाठी पोटनिवडणूक घेण्यात येणार आहे. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी २ निवडणूक निर्णय अधिकारी व ४ सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## शिवणे येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर उत्साहात संपन्न

सांगोला(प्रतिनिधी ):–महाराष्ट्र शासनाच्या महसूल ववनविभागाच्या निर्देशानुसार छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान टप्पा १ अंतर्गत सांगोला तालुक्यातील शिवणे मंडल येथे दिनांक १० एप्रिल २०२६ रोजी मुक्ताई मंगल कार्यालय येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.सदर अभियानाचा उद्देश ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांच्या महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे, जनतेच्या तक्रारी तत्काळ निकाली काढणे तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करणे हा आहे. या शिबिरास कु. बाळुताई भागवत (तहसीलदार, सांगोला), श्री. उमेशचंद्र कुलकर्णी (गट विकास अधिकारी, सांगोला), श्रीमती स्मिता गोडसे (पंचायत समिती सदस्य), श्री. मोहन आलदर (जिल्हा परिषद सदस्य) यांचे प्रतिनिधी श्री. बाळासाहेब काटकर, खरेदी–विक्री संघाचे संचालक श्री. दादासाहेब घाडगे तसेच शिवणे गावचे विद्यमान सरपंच उपस्थित होते. यावेळी मंडल अधिकारी, मंडल कृषी अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, कृषी सहाय्यक तसेच शिवणे मंडलातील अनेक लाभार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरात विविध महसूल विषयक तक्रारी व अर्ज स्वीकारून त्यांचे मार्गदर्शन व निराकरण करण्यात आले.तसेच तालुका कृषि अधिकारी सांगोला या विभागा अंतर्गत मंजुर शेती अवजारे व टॅक्ट्रर यांचे मंजुरीचे ५ प्रमाणपत्र वितरीत करणेत आले आहे. तसेच ग्राम विकास विभागाकडुन मंजुर घरकुलाचे आदेश वितरणीत करणेत आले आहेत

## चोपडी येथे होमिओपॅथी दिन साजरा

नाझरा (वार्ताहर):–होमिओपॅथीचे जनक सॅम्युएल हॅनिमन जयंती साजरी करण्यात आली. चोपडी येथील आधार हॉस्पिटलया ठिकाणी होमिओपॅथी दिनाच्या निमित्ताने सॅम्युएल हॅनिमनयांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. डॉ. वामन चांडवले,माजीमुख्याध्यापक यशवंत बाबर, सेवानिवृत्त अभियंता एल.बी.केंगार,सेवानिवृत्त शिक्षक आर.एस. बाबर, विधीज्ञ संजीवकांबळे यांच्या उपस्थितीत प्रतिनिचे पूजन करण्यात आले.यावेळी बोलताना डॉ. वामन चांडवले म्हणाले की,जर्मनीयेथे जन्मलेल्या हॅनिमन यांनी होमिओपॅथी मधील विविध सिद्धांतमांडून वैद्यकीय क्षेत्रात नवे दालन उघडले. त्यांच्या या शोधामुळेजगभरात होमिओपॅथीला एक वेगळी ओळख मिळाली.आजच्या काळात नैसर्गिक आणि सौम्य उपचार पद्धती म्हणूनहोमिओपॅथीचे महत्त्व वाढत असून, हॅनिमन यांचे कार्यप्रेरणादायी ठरत आहे.या निमित्ताने त्यांच्या कार्याचा वारसा जपत, समाजाच्याआरोग्यसेवेत योगदान देण्याचा संकल्पही त्यांनी केला.

## नालसा वीर परिवार सहायता योजना २०२५ अंतर्गत सोलापूर येथे कायदेशीर मदत व जनजागृती मेळावा संपन्न

सोलापूर (जिमाका):– नालसा वीर परिवार सहायता योजना–२०२५ अंतर्गत सेवारत तसेच सेवानिवृत्त सैनिकांच्या कुटुंबियांना कायदेशीर मदत व कायदेविषयक जनजागृती करण्यासाठी सोलापूर येथे मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.सदर योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यात दिनांक ०८ ऑगस्ट २०२५ रोजी नालसा वीर परिवार सहायता योजना समितीची स्थापना करण्यात आली असून, त्यानुसार जिल्ह्यातील सैनिक कुटुंबियांना जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर येथे दर मंगळवारी विनामूल्य कायदेशीर मदत दिली जात आहे.योजनेच्या स्थापनेपासून आजतागायत फौजदारी, दिवाणी, महसूल व इतर अशा एकूण ७९ प्रकरणांमध्ये तज्ज्ञ वकिलांची नेमणूक करून सैनिकांच्या कुटुंबियांना कायदेशीर सल्ला देण्यात आला आहे. या माध्यमातून लाभार्थ्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक बचतीचा अप्रत्यक्ष लाभ झाला आहे.याच अनुषंगाने दिनांक ०७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर येथे कायदेशीर मदत व जनजागृती बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत ॲड. लक्ष्मण बाळासाहेब पाटील (पॅनल विधिज्ञ), शिवकैलास झुरळे (उपमुख्य लोकअभिरक्षक), जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर यांनी विविध प्रकरणांतील कायदेशीर मदतीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले (पान ३ वर)

## संपादकीय......

जुने वर्ष ४३ वे अंक २४ वा

# तैलयुद्धातून चलनसंघर्षाकडे...

छश्चिम आशियातील तणावावर पडदा टाकणारा अमेरिका–इराण युद्धविराम जाहीर झाला आणि जागतिक बाजारपेठांनी सुटकेचा निःश्वास टाकला. कच्च्या तेलाचे दर झपाट्याने खाली आले, शेअर बाजार तेजीत गेले; पण या सगळ्या गदारोळात एक महत्त्वाचा धागा दुर्लक्षित राहिला आणि तो म्हणजे चीनची पडद्यामागची भूमिका आणि 'पेट्रोयुआन' या नव्या आर्थिक शस्त्राची शांतपणे होत असलेली चाचपणी. कालपर्यंत चर्चा युद्धविरामाची, कूटनीतीची आणि संभाव्य संघर्षविरामाची होत होती; आज मात्र लक्ष केंद्रित होत आहे, ते तेलाच्या राजकारणावर आणि त्यातून आकार घेत असलेल्या चलनी वर्चस्वाच्या लढाईवर. जगाच्या ऊर्जा नाडीवर नियंत्रण निव्वळ आर्थिक नव्हे, तर सामरिक आणि राजकीय प्रभुत्वाचाही तो मार्ग असतो आणि याच ठिकाणी 'पेट्रोयुआन विरुद्ध पेट्रोडॉलर' ही लढाई निर्णायक ठरणार आहे. जागतिक अर्थव्यवस्थेत 'पेट्रोडॉलर' ही संकल्पना नवीन नाही. १९७०च्या दशकात अमेरिका आणि सौदी अरेबियामधील करारानंतर तेलाचा व्यापार प्रामुख्याने अमेरिकी डॉलरमध्येच होऊ लागला. परिणामी, जगभरातील देशांना तेलखरेदीसाठी डॉलर साठवणे अपरिहार्य झाले. डॉलरची मागणी वाढली, अमेरिकेचे चलन जागतिक राखीव चलन म्हणून स्थिर झाले आणि अमेरिकेला त्यातून अपार आर्थिक व सामरिक फायदा झाला. सोप्या भाषेत सांगायचे तर, तेल विकले गेले तरी नफा डॉलरच्या माध्यमातून पुन्हा अमेरिकेकडे परतत राहिला. याच व्यवस्थेला धक्का देण्याचा प्रयत्न आता चीन करत आहे. 'पेट्रोयुआन' ही कल्पना म्हणजे तेलाचा व्यापार चीनच्या चलनात अर्थात 'युआन'मध्ये करणे. वरकरणी हा व्यापारातील बदल वाटत असला, तरी त्याचे परिणाम दूरगामी ठरु शकतात. तेल उत्पादक देशांनी मोठ्या प्रमाणावर युआन स्वीकारायला सुरुवात केली, तर डॉलरची जगभरातील मागणी कमी होऊ शकते आणि हीच अमेरिकेसाठी खरी धोयाची घंटा. चीनने या दिशेने पावले टाकण्यास आताच नव्हे तर काही वर्षांपूर्वीच सुरुवात केली होती. रशिया, इराण, व्हेनेझुएला यांसारख्या अमेरिकी निर्बंधांना सामोरे जाणार्या देशांबरोबर चीनने युआनमध्ये व्यवहार वाढवले. विशेषतः इराणसारख्या देशासाठी, ज्यावर अमेरिकेचे कठोर आर्थिक निर्बंध आहेत, डॉलरच्या बाहेर जाऊन व्यापार करणे ही गरजही आहे आणि संधीही. युद्धविरामाच्या पार्श्वभूमीवर इराणला पुन्हा जागतिक तेल बाजारात प्रवेश मिळण्याची शयता आहे आणि याच वेळी चीन 'पेट्रोयुआन'चा पर्याय पुढे करत आहे. त्यातच युद्धविरामाच्या चर्चांमध्ये अमेरिकेची भूमिका स्पष्ट होती, पण चीनची भूमिका मात्र सूचक आणि पडद्यामागची होती. मध्यस्थीची अधिकृत जबाबदारी अमेरिका–पाकिस्तानकडे असली, तरी चीनने इराणशी असलेले आपले आर्थिक व ऊर्जा संबंध वापरून परिस्थितीवर प्रभाव टाकला. कारण, चीनसाठी हा संघर्ष फक्त भूराजकीय नाही; तर तो आर्थिक संधींचा खेळ आहे. युद्धविराम जाहीर होताच कच्च्या तेलाचे दर सुमारे १५ टक्क्यांनी घसरले. याचा अर्थ बाजारपेठेला स्थैर्याची अपेक्षा आहे. परंतु, हे स्थैर्य तात्पुरते असू शकते. कारण, युद्धविराम हा शेवट नसून, नव्या टप्प्याची सुरुवात आहे, ती म्हणजे तेलाच्या बाजारपेठेतील आणि चलनाच्या वर्चस्वातील स्पर्धेचा टप्पा!

## नांदेड – गोदा काठावरुन
# दुर्मिळ पांढऱ्या कंठेरी चिखल्याची नोंद

नांदेड जिल्ह्यातील गोदा काठावरुन दुर्मीळ पांढऱ्या कंठेरी चिखल्या पक्ष्याची नोंद करण्यात आली आहे महाराष्ट्रात हिवाळी स्थलांतर करुन येणाऱ्या या पक्ष्याच्या अल्बिनो प्रकाराची नोंद यापूर्वी दोन वेळा झाली आहे वन्यजीवांमधील असे बदल हे प्रामुख्याने जेनेटिक म्युटेशनमुळे होतात.

कंठेरी चिखल्या हा पक्षी युरोप आणि आशियाच्या समशीतोष्ण प्रदेशातून हिवाळ्यात महाराष्ट्रात स्थलांतर करुन येतो. या पक्ष्याच्या अनेक उपप्रजाती आहेत. भारतात या पक्ष्याची एक उपप्रजाती सापडत असून ती देशात कायमस्वरुपी वास्तव्यास असते आणि जी इथेच प्रजनन करते. मात्र, हिवाळ्यात उत्तर भागातून येणाऱ्या स्थलांतर करुन येणाऱ्या उपप्रजातीमुळे त्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. डोळ्याभोवती स्पष्ट आणि ठळक



पिवळ्या रंगाचे वर्तुळ, या पक्ष्याला इतर पक्ष्यांपासून वेगळे ओळखण्यास मदत करते. हवेत उडताना याच्या पंखांवर पांढरा पट्टा नसतो, ज्यामुळे हे पक्षी मोठ्या कंठेरी चिखल्यापेक्षा वेगळे असल्याचे दिसते. मात्र, आता या पक्ष्यामधील अल्बिनो प्रकाराची म्हणजेच शरिराने पूर्णत: पांढऱ्या रंगाच्या पक्ष्याची नोंद झाली आहे.

नांदेड जिल्ह्यातील बेलूर (बुद्रुक) या गावाजवळ वाहणाऱ्या गोदावरी नदीकाठी ही नोंद ऑक्टोबर, २०२५ मध्ये झाली आहे. याची नोंद करणारे वनरक्षक मनेशकुमार सज्जन व जीवशास्त्रज्ञ दर्शन दुधाने यांनी यासंबंधी लिहलेला शोधनिबंध नुकताच प्रकाशित झाला आहे. वन्यजीवांमधील असे बदल हे प्रामुख्याने जेनेटिक म्युटेशनमुळे होतात. गुणसूत्रांमधील हे बदल त्याचे शारीरिक स्वरूप, वागणूक किंवा त्याची कार्य करण्याची क्षमता देखील बदलू शकतात. यामुळे वन्यजीवांच्या नेहमीच्या रंगापेक्षा वेगळा रंगही येऊ शकतो. शरीराचे रंग ठरवणारे 'मेलेनिन' रंगद्रव्य वाढल्यामुळे ज्याप्रमाणे वन्यजीव पूर्णत: काळे होतात म्हणजेच मेलेनिस्टिक होतात, त्याचप्रमाणे 'मेलानीन' कमी झाल्यामुळे 'ल्युकिझम' म्हणजेच पांढरा रंगही येऊ शकतो. 'ल्युकिस्टिक' प्रकारात शरीर काळे किंवा पांढरे असले तरी, वन्यजीवांचे डोळे नियमित रंगाचे असतात. 'अल्बिनो' प्रकारात डोळे लाल दिसतात. गोदाकाठी नोंदवलेल्या कंठेरी चिखल्या पक्ष्याचे डोळे हे पूर्णत: लाल आहेत.

# कवकांचे पावसाळी जग

पावसाच्या पहिल्या सरी पडताच जीवसृष्टीचा महोत्सव खर्या अर्थाने रंगू लागतो आणि निसर्गाची एक जादुई छटा पाहावयास मिळते. पृथ्वीच्या कुशीतून, गळून पडलेल्या पाल्यापाचोळ्यावर, ओलसर झाडांवर आणि झुडपांखाली रंगीबेरंगी कवक आपले अस्तित्व दर्शवू लागतात. कीटकांनंतर सर्वाधिक प्रजाती असलेल्या सजीव गटांमध्ये कवकांचा समावेश होतो. जगभरात बुरशींच्या एकूण संख्या २.२ ते ३.८ दशलक्ष प्रजाती असण्याची शक्यता आहे. मात्र, आजपर्यंत केवळ दीड लाख प्रजातींचीच नोंद आणि त्यांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. बुरशी जवळजवळ पृथ्वीवरील प्रत्येक परिसंस्थेत आढळते. मुबलक प्रमाणात होणारा पाऊस, हवामानातील आद्रता आणि ओलसरपणा हे घटक बुरशीच्या वाढीसाठी उपयुक्त असे वातावरण निर्माण करतात.

काही कवक मृतोपजीवी, सहजीवी, परोपजीवी, रोगकारक तर काही वनस्पती सोबत सहजीवी म्हणून दिसतात. मृतोपजीवी बुरशी पर्यावरणातील विघटनाची महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

वनस्पतींसोबत सहजीवनामध्ये वाढणार्या बुरशी या वनस्पतींना पाणी आणि पोषक तत्त्वे प्रभावीपणे शोषून घेण्यास मदत करतात. 'मायकोरायझा' प्रजातीची बुरशी कार्बन स्थिरीकरणाच्या प्रक्रियेलासुद्धा हातभार लावते आणि वातावरणातील कार्बन डायऑक्साईडचा उपयोग करून जास्त कार्बन स्थिरीकरणांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. तसेच, दीर्घकालीन कार्बन साठवण्यामध्ये वनस्पतींना हातभार लावते.

## व्यंगचित्रे




## सुविचार

**स्वतःच्या फायद्यासाठी अनेक जण आपल्या फांद्या तोडतील.**
**तुटलेल्या जागेवरून नवी पालवी घेऊन पुन्हा नव्याने बहरता यायला हवं.**

## धर्म

# सौंदर्यलहरी भाष्य

आदि शंकराचार्यांनी 'सौंदर्यलहरी'मध्ये जगन्मातेच्या स्वरूपाचे जे वर्णन केले आहे, ते केवळ काव्यात्म नसून ते 'शाक्त' उपासनेचे दर्शन आहे. हे दर्शन अत्यंत गुह्य अशी तंत्र–सूत्रे आणि त्यामागील आध्यात्मिक रहस्य, यांचा समसमा संयोग आहे. १३व्या श्लोकात शंकराचार्य देवीच्या कटाक्षाचे अर्थात, साधकावर पडणार्या ओझरत्या दृष्टिक्षेपाचे वर्णन करत आहेत. हे वाचताना प्रथमदर्शनी एखाद्या शृंगारिक काव्याचा भास होतो. परंतु, या श्लोकाच्या आत 'शाक्त' उपासनेचा गाभा असणारे, एक अत्यंत गहन आध्यात्मिक सत्य दडलेले आहे.

आचार्य म्हणतात, हे माते, तू एखाद्या निस्तेज, बुद्धीने जड आणि आकर्षणहीन वृद्ध पुरुषावर नेत्रकटाक्ष टाकण्याचे फळ अद्भुत आहे. तुझ्या केवळ कृपाकटाक्षाचे सामर्थ्य असे आहे की, शेकडो तरुण स्त्रिया त्याच्यावर अनुरक्त होतात. त्याच्या समीप जाण्यासाठी त्या धावत सुटतात. त्या इतया भावविव्हळ झालेल्या असतात की, आपल्या वेण्या सुटत आहेत, आपली चोळी उन्मुक्त होते आहे, आपला कमरपट्टा गळून पडतो आहे याचेसुद्धा त्यांना भान उरत नाही. या श्लोकाला वाचल्यावर प्रथमतः हाच समज होतो की, हा श्लोक स्त्रीला वश करण्यासाठी अर्थात, वशीकरण हेतूने लिहिला आहे का? परंतु, याचा गुह्य अर्थ अत्यंत वेगळा आहे.

शाक्त–परंपरेत देवीचा कृपाकटाक्ष म्हणजे, केवळ आपल्या अबोध साधकाकडे मातृभावाने, प्रेमाने बघणे नाही. देवीचा कृपाकटाक्ष हाच एक 'शक्तिपात' विधी आहे. या कटाक्षाच्या माध्यमातून, शक्तीच्या कृपेचा चैतन्यप्रवाह देवीकडून साधकाकडे प्रवाहित होतो. जेव्हा जगन्माता एखाद्यावर प्रसन्न होते, तेव्हा तिची त्याच्यावर दृष्टी पडते आणि त्या कटाक्षाने त्या व्यक्तीचे संपूर्ण अस्तित्वच बदलून जाते. हा कटाक्ष एका दृष्टीने गुरुकृपेचे, शक्तिपाताचे प्रतीक आहे. तंत्रशास्त्रात याला 'अपाङ्गकृपा' असे म्हटले जाते. ही दृष्टी साधकाची सुप्त चेतना केवळ जागृतच करत नाही, तर त्या चेतनेला ऊर्ध्वगामी करून त्याला जीवन्मुक्त करू शकते.या श्लोकाचा गुह्यभाग जाणून घेण्यासाठी, शाब्दिक प्रतीके आणि त्यामागील गहन विचार या स्वरूपात विश्लेषण करणे आवश्यक आहे. शेकडो तरुण स्त्रिया त्याच्यामागे धावतात, याचा गुह्य अर्थ फार वेगळा आहे. शाक्तदर्शनात स्त्री हे शक्तीचे प्रतीक आहे. या शेकडो युवती म्हणजे, सृष्टीतील समस्त शक्ती– पंचमहाभूते, त्रिगुण, दश महाविद्या, चौसष्ट कला; या सर्व जणू त्या साधकाच्या दिशेने ओढल्या जातात. ज्याच्यावर देवीची कृपादृष्टी आहे, निसर्ग त्याची सेवा करतो, परिस्थिती त्याच्या अनुकूल होते. संधी त्याच्याकडे आपोआप येतात. हे सारे देवीच्या कटाक्षाचे फलित आहे.

साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# स्वेरीमध्ये प्राध्यापकांची पाच दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम संपन्न


पंढरपूर– गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये 'इलेव्हेट अँड इनोव्हेट: नेक्स्ट जनरेशन टिचिंग एक्स्प्लोरींग इन्क्लुजीव्हीटी अँड डायव्हर्सीटी' (उन्नयन आणि नवनिर्मिती: सर्वसमावेशकता व विविधतेचा वेध घेणारी आधुनिक अध्यापन पद्धती) या विषयावर दि.१० मार्च ते दि. १४ मार्च २०२६ दरम्यान पाच दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम यशस्वीरित्या

संपन्न झाला. कार्यशाळेचे उदघाटन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या 'स्कुल ऑफ सोशल सायन्सेस' चे संचालक प्रा. गौतम कांबळे यांच्या हस्ते झाले. 'महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास अकादमी'चे मिथिलेश भाकरे आणि 'पीएम–उषा' चे नोडल अधिकारी प्रा. च्माकर कोलेकर हे विशेष अतिथी म्हणून यावेळी उपस्थित होते.

प्रास्तविकात डॉ.यशपाल खेडकर यांनी समावेशक व नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धतींच्या महत्त्वावर प्रकाश टाकणारी तसेच प्राध्यापकांची कार्यक्षमता वाढवण्यात आणि शिक्षणाला सातत्याने बदलणाऱ्या शैक्षणिक व सामाजिक गरजांशी सुसंगत करण्यात अशा कार्यशाळेची भूमिका किती महत्त्वाची आहे, यावर प्रकाश टाकला. कार्यशाळेच्या पहिल्या दिवशीच्या प्रथम सत्रात मिथिलेश भाकरे यांनी आपल्या 'फाउंडेशन ऑफ इन्क्लुजिव्ह क्लासरुम्स' या प्रथम सत्राचा उद्देश हा शिक्षकांमध्ये समावेशक शिक्षणाबद्दल जागरुकता आणि समज निर्माण करण्याचा असल्याचे सांगितले.

सहयोग, सहानुभूती आणि लवचिक अध्यापन पद्धतींवर भर देऊन, प्रत्येक विद्यार्थ्याला मूल्यवान,पंढरपूर– गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये 'इलेव्हेट अँड इनोव्हेट: नेक्स्ट जनरेशन टिचिंग एक्स्प्लोरींग इन्क्लुजीव्हीटी अँड डायव्हर्सीटी' (उन्नयन आणि नवनिर्मिती: सर्वसमावेशकता व विविधतेचा वेध घेणारी आधुनिक अध्यापन पद्धती) या विषयावर दि.१० मार्च ते दि. १४ मार्च २०२६ दरम्यान पाच दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम यशस्वीरित्या संपन्न झाला.

कार्यशाळेचे उदघाटन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या 'स्कुल ऑफ सोशल सायन्सेस' चे संचालक प्रा. गौतम कांबळे यांच्या हस्ते झाले. 'महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास अकादमी'चे मिथिलेश भाकरे आणि 'पीएम–उषा' चे नोडल अधिकारी प्रा. च्भाकर कोलेकर हे विशेष अतिथी म्हणून यावेळी उपस्थित होते. प्रास्तविकात डॉ.यशपाल खेडकर यांनी समावेशक व नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धतींच्या महत्त्वावर प्रकाश टाकणारी तसेच प्राध्यापकांची कार्यक्षमता वाढवण्यात आणि शिक्षणाला सातत्याने बदलणाऱ्या शैक्षणिक व सामाजिक गरजांशी सुसंगत करण्यात अशा कार्यशाळेची भूमिका किती महत्त्वाची आहे, यावर प्रकाश टाकला. कार्यशाळेच्या पहिल्या दिवशीच्या प्रथम सत्रात मिथिलेश भाकरे यांनी आपल्या 'फाउंडेशन ऑफ इन्क्लुजिव्ह क्लासरुम्स' या प्रथम सत्राचा उद्देश हा शिक्षकांमध्ये समावेशक शिक्षणाबद्दल जागरूकताआणि समज निर्माण कर याचा असल्याच सांगितले जाते.




# ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचे निधन

मुंबई : ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचे निधन झाले असून वयाच्या ९२ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. भारतरत्न आणि 'गानसम्राज्ञी' लता मंगेशकर यांची लहान बहीण असलेल्या आशा भोसले यांना हिंदी सिनेसृष्टीची वर्सटाईल गायिका म्हणून ओळखले जायचे. तब्बल सहा दशके त्यांनी इंडस्ट्रीत आपल्या गाण्यांना आवाज दिला. त्यांनी केवळ हिंदीतच नाही तर, मराठी, बंगाली, गुजराती, तमिल, तेलुगुसह अनेक भाषांमध्ये गाणी गायलीत. हिंदी सिनेसृष्टीतील दिग्गज संगीतकार आरडी बर्मन, ओपी नैय्यर, सचिन देव बर्मन, लक्ष्मीकांत–प्यारेलाल यांच्यासोबत त्यांनी अनेक अजरामर गाणी गायली. 'दम मारो दम' आणि 'ओम शांति ओम'यांसारखी अनेक सुपरहिट गाणी आशा भोसले यांनी इंडस्ट्रीला दिली. आशा भोसले यांचे पुत्र आनंद भोसले यांनी माध्यमांसमोर येऊन आशा ताईंच्या निधनाची बातमी साश्रू नयनांनी दिली. तसेच, आशाताईंवर उद्या (सोमवारी) सकाळी अकरा वाजल्यापासून तीन वाजेपर्यंत त्यांचे अंत्यदर्शन घेता येईल. त्यानंतर आशा भोसले यांची अंत्ययात्रा निघेल आणि सायंकाळी चार वाजता त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले जातील. शिवाजी पार्क येथील स्मशानभूमीत शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

ब्रीच कँडी रुग्णालयाबाहेर सुरक्षा वाढवली

प्रकृती अस्वास्थामुळे आशा भोसले यांना ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आल होते. तिथेच उपचारादरम्यान त्यांनी अखेरचा श्वास घेतला. दिग्गज गायिकेच्या निधनानं संपूर्ण देशावर शोककळा पसरली आहे. अशातच ब्रीच कँडी रुग्णालयाबाहेरची सुरक्षा वाढवण्यात आली आहे.

## नालसा वीर परिवार...

(पान १ वरुन) तसेच इच्छुक लाभार्थ्यांनी दर मंगळवारी कार्यालयात उपस्थित राहून सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष मेजर मिलिंद देवदत्त तुंगार (नि.), जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी भूषविले व उपस्थितांना मार्गदर्शन केले.जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर यांच्यामार्फत वैद्यकीय शिबिराचे आयोजनही करण्यात आले. या शिबिरात छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथील डॉ. नित्यानंद चिल्लोळे व डॉ. आरव कांबळे यांच्या टीमने उपस्थितांची वैद्यकीय तपासणी, उपचार व मार्गदर्शन केले.या मेळाव्यास जिल्ह्यातील एकूण ५४ माजी सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी तसेच संबंधित कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन ॲड. लक्ष्मण बाळासाहेब पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन संजीव व्यंकटराव पवार, सहाय्यक, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी व्यक्त केले.

# महिला कॉन्स्टेबलच्या साक्षीमुळे ९ पोलिसांना फाशी

सथानकुलम – कोविडच्या काळात संपूर्ण देश लॉकडाऊनमध्ये असताना तमिळनाडूतील सथानकुलम येथे एका घटनेने सर्वांना हादरवून सोडले होते. पोलीस कोठडीत बाप आणि लेकाला झालेल्या अमानुष मारहाणीमुळे त्यांचा अत्यंत वेदनादायक अंत झाला. या खळबळजनक प्रकरणात आता मद्रास उच्च न्यायालयाच्या मदुराई खंडपीठाने मोठा निकाल दिला असून, दोषी ठरलेल्या ९ पोलिसांना फाशीची शिक्षा सुनावली आहे. यच प्रकरणाला वाचा फोडण्यात एका महिला हेड कॉन्स्टेबल एस. रेवती यांची धाडसी साक्ष अत्यंत महत्त्वाची ठरली. न्यायालयाने या घटनेला 'अतिशय दुर्मिळ गुन्हा' असे नमूद करत, पीडित कुटुंबाला १.४ कोटी रुपयांची भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत.



ही संपूर्ण घटना २०२० मधील कोविड लॉकडाऊनच्या काळातील आहे. १९ जून २०२० रोजी लॉकडाऊनच्या नियमांचे उल्लंघन करून मोबाईलचे दुकान जास्त वेळ उघडे ठेवल्याच्या आरोपावरून पी. जयराज (वय ५८ वर्षे) आणि त्यांचा मुलगा जे. बेनिक्स (वय ३१ वर्षे) यांना सथानकुलम पोलिसांनी ताब्यात घेतले. मात्र, पोलीस ठाण्यात त्यांना रात्रभर भयंकर यातना देण्यात आल्या. साक्षीदार एस. रेवती यांनी न्यायालयात दिलेल्या माहितीनुसार, त्या रात्री साडे आठ वाजता त्या ड्युटीवर आल्यावर त्यांना एका खोलीतून वेदनेने विव्हळण्याचा आवाज आला. तिथे काही पोलीस कर्मचारी या बाप-लेकाला काठ्यांनी आणि बुटांनी बेदम मारहाण करत होते. त्यांच्या गुप्तांगांवरही आघात करण्यात आले. मारहाण करणारे पोलीस मध्येच दारू पिऊन पुन्हा दुप्पट क्रूरतेने त्यांना मारत होते. या अमानुष कृत्यामुळे ते दोघे रक्तबंबाळ झाले असतानाही, त्यांनाच त्यांच्याच रक्ताने माखलेली फरशी पुसायला लावण्यात आली. रेवती यांनी त्यांना कॉफी देण्याचा प्रयत्न केला असता, तोही उधळून लावला गेला आणि त्यांना नग्नावस्थेत बांधून ठेवण्यात आले.

या भयंकर मारहाणीमुळे गंभीर जखमी झालेल्या बेनिक्स यांनी २२ जून रोजी, तर वडील जयराज यांनी २३ जून रोजी अखेरचा श्वास घेतला. शवविच्छेदन अहवालानुसार या दोघांचा मृत्यू अतिरक्तस्रावामुळे झाल्याचे स्पष्ट झाले. या घटनेनंतर एस. रेवती यांच्यावर पोलीस खात्यातून आणि बाहेरून प्रचंड दबाव व धमक्या आल्या, परंतु त्यांनी न घाबरता न्यायालयासमोर सत्य मांडले. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींची ओळख पटली. या प्रकरणाचा तपास सुरुवातीला स्थानिक पोलिसांनी केला, त्यानंतर मद्रास उच्च न्यायालयाच्या आदेशाने तो सीबीआयकडे सोपवण्यात आला. सीबीआयने न्यायालयात सविस्तर आरोपपत्र दाखल केले. या प्रकरणात एकूण १० पोलिसांना दोषी ठरवण्यात आले होते, त्यातील एकाचा कोविडमुळे मृत्यू झाला, तर उर्वरित ९ पोलिसांना मृत्युदंडाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

# तुकाराम मुंढे यांची बदली रद्द; प्रशासन हादरले, सरकारवर दबाव वाढला

मुंबई । राज्यातील कडक आणि प्रामाणिक कारभारासाठी ओळख असलेले आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या बदलीच्या निर्णयावर अखेर ब्रेक लागल्याची चर्चा असून, या घडामोडीमुळे प्रशासन आणि राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. आधीच वादग्रस्त ठरलेल्या या बदलीवरून सरकारची कोंडी झाली होती.राज्य सरकारने नुकत्याच मोठ्या प्रमाणात आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करताना मुंढे यांची दिव्यांग कल्याण विभागातून आपत्ती व्यवस्थापन विभागात बदली केली होती. मात्र त्यांच्या कार्यशैलीवर खुश असलेल्या दिव्यांग बांधवांनी रस्त्यावर उतरून जोरदार आंदोलन छेडले होते. मुंढे यांची बदली रद्द झालीच पाहिजे अशा घोषणांनी प्रशासन दणाणून गेले होते. मुंढे यांनी दिव्यांग विभागात



बोगस प्रमाणपत्रांवर मोठी कारवाई केल्यामुळे अनेकांचे हितसंबंध धोक्यात आले होते. त्यामुळेच ही बदली ही राजकीय सूडाची कारवाई असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात होता. दरम्यान, वारंवार होणाऱ्या बदल्यांमुळे आधीच चर्चेत असलेले मुंढे पुन्हा एकदा सत्तेच्या निर्णयांवर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहेत. त्यांच्या २१ वर्षांच्या कारकिर्दीत दोन डझनपेक्षा अधिक वेळा बदली झाल्याने प्रशासनातील पारदर्शकतेवरच प्रश्न उपस्थित होत आहेत. या पार्श्वभूमीवर बदली रद्द झाल्याची माहिती समोर येताच, सरकारच्या निर्णयक्षमतेवर आणि दबावाखाली घेतल्या जाणाऱ्या निर्णयांवर टीकेची झोड उठली आहे. जनतेच्या दबावापुढे सरकार झुकले का? की आतल्या गोटातील संघर्षामुळे हा निर्णय बदलावा लागला? असे सवाल आता राजकीय पातळीवर उपस्थित होत आहेत.एकूणच, तुकाराम मुंढे प्रकरणाने पुन्हा एकदा प्रशासनातील राजकीय हस्तक्षेप, प्रामाणिक अधिकाऱ्यांची होणारी घुसमट आणि निर्णय प्रक्रियेतील पारदर्शकतेचा अभाव उघड केला आहे.

# त्रैमासिक विवरणपत्र ई.आर-१ ऑनलाईन सादर करण्याचे आवाहन

सोलापूर (जिमाका) : सोलापूर जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी कार्यालयांनी मार्च २०२६ अखेरचे त्रैमासिक विवरणपत्र (ई.आर-१) ३० एप्रिल २०२६ पर्यंत ऑनलाईन सादर करणे बंधनकारक असल्याचे आवाहन करण्यात आले आहे. कायदेशीर तरतूद- सेवायोजन कार्यालये (रिक्तपदे अधिसूचीत करण्याची सक्ती करणारा) कायदा १९५९ व नियमावली १९६० मधील कलम ५(१) व ५(२) नुसार ही माहिती सादर करणे आवश्यक आहे. - सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील आस्थापनांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांची पुरुष/स्त्री/एकूण संख्या स्थानिक सेवायोजन कार्यालयास ऑनलाईन सादर करावी. माहितीचा उपयोग- प्राप्त सांख्यिकी माहितीचा उपयोग योजनाबद्ध आर्थिक विकासासाठी, प्रकल्प तयार करण्यासाठी व मनुष्यबळाचा अंदाज घेण्यासाठी केला जातो. - ही माहिती महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालय, नवी दिल्ली यांना दर तिमाहीस पाठविली जाते. सादरीकरणाची प्रक्रिया- विवरणपत्र ई.आर-१ हे https://rojgar.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवर सादर करणे आवश्यक आहे. - प्रत्येक आस्थापनाला युजर आयडी व पासवर्ड पूर्वीच देण्यात आले असून त्याचा वापर करून विवरणपत्र भरावे. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थकोट, पार्क चौक, सोलापूर (०२१७-२९९२९५६) येथे संपर्क साधावा. तसेच सर्व आस्थापनांनी विहित वेळेत विवरणपत्र सादर करावे, असे आवाहन कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाच्या सहाय्यक आयुक्त संगीता खंदारे यांनी केले आहे.

निर्भिड व सडेतोड
बातम्यांसाठी
नियमित वाचा
साप्ताहिक माणदेश वार्ता

# उदनवाडी येथे भाजपचा ४६ वा स्थापना दिवस साजरा

सांगोला(प्रतिनिधी):- सोमवार दिनांक ६ एप्रिल २०२६ रोजी भाजपा जनसंपर्क कार्यालय उदनवाडी येथे भाजपचा ४६ वा स्थापना दिवस मोठ्या आनंदमय वातावरणामध्ये साजरा करण्यात आला. प्रारंभी भाजपचे सर्व पदाधिकारी,कार्यकर्ते यांच्या हस्ते भाजपचा ध्वज फडकविण्यात आला तसेच भारतीय जनता पार्टीचा विजय असो अशा घोषणा देण्यात आल्या. त्यानंतर उदनवाडी येथील अंगणवाडी या ठिकाणी लहान मुलांना खाऊ वाटप करण्यात आला .उदनवाडी येथे गेल्या तीन ते चार वर्षापासून भाजपा जनसंपर्क कार्यालय चालू आहे . या माध्यमातून अनेक गोरगरीब,दिव्यांग बांधव, विधवा व निराधार,बांधकाम कामगार यांना विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यात आला आहे. शासनाच्या सर्व योजना गोरगरिबापर्यंत पोहोचवण्यात येत आहेत. इथून पुढच्या काळात घर चलो अभियान राबवून सर्व घराघरापर्यंत पोहोचून वंचित लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यात येणार आहे. घर चलो अभियान राबवताना त्या गावातील रस्ते, पाणी, वीज,या मूलभूत समस्या सोडवण्यावर भर देण्यात येईल. भाजपा स्थापना दिनाच्या कार्यक्रमासाठी भाजपचे सर्व शक्ती प्रमुख, बूथ अध्यक्ष,पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शासकीय सेवेत निवड झाल्याबद्दल श्रिया सोनलकर हिचा चैतन्य मित्र मंडळातर्फे सत्कार

सांगोला (प्रतिनिधी):-महाराष्ट्र शासनाच्या स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश संपादन करून सरळ सेवेतून शासकीय सेवेत निवड झाल्याबद्दल सांगोला विद्यामंदिरची माजी विद्यार्थिनी कु. श्रिया उत्तम सोनलकर हिचा चैतन्य मित्र मंडळाच्या वतीने विशेष गौरव करण्यात आला. श्रियाची मुंबई येथे लेखापाल या पदावर नियुक्ती झाली आहे.श्रिया सोनलकर हिने तिचे उच्च शिक्षण गोंदिया येथून पूर्ण केले असून तिने बी.एससी. (कृषी) आणि एल.एल.बी, एम.बी.ए या पदव्या संपादन केल्या आहेत. स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून थेट शासकीय सेवेत प्रवेश मिळवून तिने आपल्या कुटुंबाचा आणि सांगोला शहराचा नावलौकिक वाढवला आहे. ती सांगोला विद्यामंदिर प्रशालेतील तंत्र शिक्षक श्री. उत्तम केरप्पा सोनलकर यांची कन्या होय.चैतन्य मित्र मंडळाच्या वतीने आयोजित या सत्कार सोहळ्याला सेवानिवृत्त प्राचार्य बाळासाहेब वाघमारे, भीमाशंकर पैलवान, नारायण विसापूरे, प्रा. राजेंद्र ठोंबरे, मारुती बोरकर यांसह मंडळाचे इतर सदस्य व मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी श्रियाच्या जिद्दीचे कौतुक करून तिला भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. आपल्या यशाबद्दल बोलताना श्रियाने, सातत्यपूर्ण अभ्यास आणि पालकांचे प्रोत्साहन यामुळेच हे यश मिळाल्याचे नमूद केले. या यशाबद्दल सर्व स्तरातून तिचे अभिनंदन होत आहे.

# आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांचेकडून कु. ज्ञानेश्वरी आबासो मेटकरी यांचा सत्कार समारंभ संपन्न.

सांगोला(प्रतिनिधी):-सावे येथील कु.ज्ञानेश्वरी मेटकरी हिची पिंपरी चिंचवड येथे पोलीस कॉन्स्टेबल पदी निवड झाल्याबद्दल आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांचेकडून त्यांचा सत्कार संपन्न झाला. या सत्कार प्रसंगी भाग्योदय अर्बन बँकेचे चेअरमन श्री हरी बंडा मेटकरी सर,व्हॉइस चेअरमन पांडुरंग सदाशिव देशमुख तसेच ,जालिंदर पारसे, दाजी शेंबडे गुरुजी व इतर मान्यवर उपस्थित होते, यावेळी बोलताना आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या..

भावपूर्ण श्रध्दांजली चौदावे पुण्यस्मरण



कै.कमळाबाई शिवाजी सोनवणे
मृत्यू दिनांक:११ एप्रिल २०१२

-:आपलेच:-
✻ विश्वजित भागवत सोनवणे ✻ ॲड. श्री. रोहित मारूती सोनवणे ✻
✻ अमरजित भागवत सोनवणे ✻

सोनवणे,खंदारे,पोळ,कटके,बोराडे,शिंदे,चौधरी परिवार